# विद्यार्थी अभिप्राय विश्लेषण समिती अहवाल 2020 – 21

# Student Feedback Analysis Committee Report 2020-21

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा कडुन शैक्षणिक वर्ष 2020–21 च्या 45 विद्यार्थ्यांचे अभिप्राय पत्र ( फिडबॅक फॉर्म ) विद्यार्थी अभिप्राय विश्लेषण समितीला प्राप्त झाले. **कला,वाणिज्य व विज्ञान** या तिन्ही विभागाच्या विद्यार्थ्यांकडुन हे प्रपत्र प्राप्त झाले. वर्ष 2020–21 हे जागतिक कोविड – 19 महामारी होती. ज्यामुळे कमी विद्यार्थ्यांनी अभिप्राय सादर केले. अंतिम वर्षाच्या सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली तपशील तयार केला असता खालील विद्यार्थ्यांनी अभिप्राय अर्ज भरून दिले.

| विद्या शाखा | प्रवेशित विद्यार्थी संख्या | प्राप्त अभिप्राय अर्ज | टक्केवारी |
|---|---|---|---|
| कला | 20 | 09 | 45 टक्के |
| वाणिज्य | 52 | 20 | 38.46 टक्के |
| विज्ञान | 60 | 16 | 26.67 टक्के |

सर्व शाखेमधुन 34.09 टक्के विद्यार्थ्यांनी प्रत्याभरण अर्ज भरून दिले. हे तिनही विभागाचे अर्ज जमा करून विज्ञान विभागातील प्रत्याभरण अर्ज हे वाणिज्य विभागाकडे मुल्यांकनासाठी दिली गेली.

वाणिज्य विभागातील प्रत्याभरण अर्ज कला विभागाकडे मुल्यांकनासाठी दिली गेली. कला विभागातील प्रत्याभरण अर्ज विज्ञान विभागाकडे मुल्यांकनासाठी दिली गेली. अभिप्राय अर्जामध्ये विद्यार्थ्यांकडुन खालील माहिती मागविण्यात आली होती. त्याची संक्षिप्त नोंद खालीलप्रमाणे

01.विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाबाबतचे मत.

02.विद्यार्थ्यांचा शिक्षकांबद्दलचा अभिप्राय

तीनही शाखेच्या तृतीय वर्षातील महाविद्यालयातुन बाहेर पडणा–या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाबाबतचे मत त्यांनी प्रत्याभरण अर्जात नमूद केलेले आहे.

विद्यार्थ्यांनी खालील बाबींविषयी उत्तम अभिप्राय नोंदवला जसे की, महाविद्यालयातील मुलभुत सुविधांची उपलब्धता, संकुलातील स्वच्छता, प्रयोगशाळेतील सुरक्षा व्यवस्था, प्रेरणादायी शैक्षणिक पध्दतींचा, वाहनतळ व्यवस्थेचा आणि शैक्षणिक साधनांचा (पीपीटी इत्यादी ) , तसेच शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थी माहिती संप्रेषण जसे की वेबसाईट, महिला कक्ष, ग्रंथालयीन कर्मचा–यांचा दृष्टिकोन आणि वाचन साधनांची उपलब्धता, OPAC सेवा अथवा एन – लिस्ट यादीची उपलब्धता, महाविद्यालयातील उपहार गृह, प्रसाधन

गृह, महाविद्यालयाचा परिसर, प्राथमिक उपचार पेटी, 'कमवा आणि शिका', योजना महाविद्यालयीन शिस्त, तक्रार निवारण समित, महिला समिती, विद्यार्थी माहिती पध्दती, विद्यार्थी रोजगार कक्ष, कार्यालयीन कर्मचारी, प्रयोगशाळेतील सुविधा, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग, वार्षिक सामाजिक स्नेहसंमेलन, स्वच्छता आणि अध्ययन – अध्यापनाचे वातावरण याबद्यल समाधान व्यक्त केले.

विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या ठिकाणी केलेली सुचना विचार घेता ते खालील सेवा सुविधांकडे लक्ष देण्याचे सुचवितात.

वर्ग खोल्या, संदेश व्यवस्था, भवितव्याप्रतीचे मार्गदर्शन, क्रीडा सुविधा प्रशिक्षकाची उपलब्धता, विद्यार्थीनीचा सहभाग, पुस्तकांची उपब्धता, पुस्तके, नियतकालीके, मासीके, संशोधन पत्रिका वर्तमानपत्र, यांची ग्रंथालयात उपलब्धता करणे, रिकाम्या क्लास वेळेस बैठक व्यवस्थांची मागणी केली.

02) विद्यार्थ्यांचे शिक्षकांबद्यलचे अभिप्राय :–

शाखा निहाय व विषयनिहाय सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्यलचे मत प्रत्याभरण अर्जामध्ये भरलेले आहे ते खालीलप्रमाणे.

विद्यार्थ्यांनी खालील बाबींची सकारात्मक नोंद केली आहे शिक्षकांच्या प्रती प्रशंसा व्यक्त केली. संकुलामध्ये शिक्षकांची उपस्थिती, शिक्षकांची वर्गावरीची नियमित उपस्थिती, अभ्यासक्रमाचे परीपुर्ण ज्ञान, वर्गावरील नियंत्रण, अभ्यासक्रम केंद्रीत, अभ्यासक्रमाची वेळेत परिपुर्णता, शिकवणी व संभाषण, कौशल्य सामुग्री आणि पुस्तके यांची उपलब्धता ग्रंथ विद्यार्थ्यांना देणे, अद्यावत शैक्षणिक साधनांचा चा वापर, विद्यार्थ्यांचे अवलोकन आणि आकलन तसेच विकास प्रतिसाद यांचे मुल्यांकन करण्याची क्षमता, उच्च शिक्षणाप्रति विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करणे, विद्यार्थ्यांप्रतिचा सकारात्मक दृष्टिकोन, विद्यार्थ्यांसोबत काम करण्याची तत्परता आणि अनुकुलत, व विद्यार्थ्यांना नैतिक मुल्यांचे शिकवण देण्याची प्रेरणा देणे. आदर्श शिक्षक संबोधुन विद्यार्थ्यांनी अभिप्राय दिला आहे. एकंदरीत सर्व अभिप्राय चांगले नोंदवले गेलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी खालील बाबींप्रती चांगला अभिप्राय नोंदवला संवेदनशिलता व जबाबदारीपणा, असायनमेंटची उपयुक्तता, वर्गचाचणी, प्रश्नोत्तरे व पाठ इत्यादी विषयाला वास्तविक जीवनाशी निगडीत करण्याचे कौशल्य आणि विषयांमध्ये आवड निर्माण करण्याचे कौशल्य आणि संबंधित क्षेत्रामध्ये जे अद्यावत विकासाचे संदर्भ देणे आणि प्रेरणादायी शिकवणी पध्दतीचा व शैक्षणिक साधनांचा वापर करण्याचे कौशल्य इत्यादी घटकांवर समाधानकारक नोंद केली आहे.

01.विद्यार्थ्यांकरीता वाचन कक्ष.

02.विद्यार्थ्यांसाठी शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय.

03.विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय परिसरात बैठक व्यवस्था लवकर करावी.

04.सुसज्ज वर्ग खोल्या, संदेशवाहनाची उपलब्धता, भविष्याप्रतिचे मार्गदर्शन, कीडा सुविधा पुरवाव्यात, कीडा प्रशिक्षकाची उपलब्धता, कीडा क्षेत्रात मुलींचा सहभाग, संबंधित विषयावरील पुस्तके व मासिके, नियतकालीके, वर्तमानपत्रे यांची ग्रंथालयात उपलब्धता व सत्यप्रति सुविधा यांची उपलब्धता करावी,वाचन कक्ष उपलब्ध करून देणे.

05.विषयाप्रती आवड निर्माण करणे आणि संबंधित क्षेत्रात झालेल्या नवनविन विकासांचा संदर्भ देणे व तसेच प्रेरणादायी शैक्षणिक पध्दतींचा वापर करणे.

प्रा.डॉ.डी.सी.कमठाणे
समन्वयक,
विद्यार्थी अभिप्राय विश्लेषण समिती

प्रा.डॉ.जे.एस.पुल्ले
समन्वयक,
शैक्षणिक नियोजन व
अंकेक्षण समिती

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Principal
Shri Guru Buddhiswami
Mahavidyalaya, Purna (Jn.)